**विषय:- अर्थसंकल्पीय तरतूदीचे पुर्नविनियोजन करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.प्रशासक तथा आयूक्त सो. यांचे अधिकार आहेत. त्याचप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दर वर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाजपत्रक तयार केले जातात. सन २०२२ - २०२३ या आर्थीक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्षनिहाय तसेच बाब निहाय आर्थीक तरतूद करण्यांत आली होती. या तरतूदीमधून आतापर्यत खर्च करण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे नमूद आहे. <u>(आकडे लाखात)</u>

| अ.क्र | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२२-२३ करीता करणेत आलेली तरतूद | सन २०२२-२३ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | शिल्लक | पुर्नविनियोजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | **नविन पाईप लाईन टाकणे** | १००.०० | ९९.०० | १.०० | २५ लक्ष |
| २ | **पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे** | १५०.०० | १४९.५२ | ०.४८ | १० लक्ष |
| ३ | **पाणी टँकर भाडे** | २०.०० | ९.४३ | १०.५७ | ४० लक्ष |
| २ | **एकुण** | **२७०.००** | **२५७.९५** | **१२.०५** | **७५ लक्ष** |

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये नविन पाईप लाईन टाकणे,पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे,पाणी टँकर भाडे या लेखाशिर्षकामध्ये कामाच्या सोयीच्या दृष्टीने आयुक्त सो यांनी मान्यता दिलेली आहे. वर तक्त्यात नमूद कामे निधी अभावी प्रलंबित आहेत. सदर लेखा शिर्षकामध्ये पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२, कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षामधील रक्कम खर्च झाली नसेल व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तूलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करुन भागवीता येवू शकतो व असे पुर्नविनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांना आहेत.

पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे,नविन पाईप लाईन टाकणे, पाणी टँकर भाडे या लेखाशिर्षकाकरीता पुर्नविनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वंतत्र्य नमूना क्र.१० नियम २० (३) प्रस्ताव तयार केला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२ कलम १०३ कलम १०४ अन्वये पुर्नविनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो, यांना आहेत.

वऱ्हाळा तलाव जलशुध्दीकरण केंद्र नव्याने बांधणे या लेखाशिर्षाखाली सन २०२२-२३ या आर्थीक वर्षात रु.१००.०० लक्ष ठेवण्यात आले आहेत. या लेखाशिर्षामधून रु.२३.१९ मात्र खर्च झालेला उर्वरीत तरतूद रु.७६.८१ मात्र शिल्लक आहे या लेखाशिर्षामधून नविन पाईप लाईन टाकणे या लेखाशिर्षात रु.२५.०० लक्ष व पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे या लेखाशिर्षात रु.१०.०० लक्ष तसेच पाणी टँकर भाडे या लेखाशिर्षात रु.४०.०० लक्ष असे एकुण रु.७५.०० लक्ष पुर्नविनियोजन करणेकरीता पाणी पुरवठा विभागाकडून प्रस्तावीत करण्यात येत आहेत.

**प्रशासकीय ठराव क्र. ६१७** **दिनांक२२/०९/२०२३.**

मा.स्थायी समिती व मा.महासभा अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२(अ)च्या (१ ब)नुसार पाणी पुरवठा विभागाकडील व-हाळा तलाव जलशुध्दीकरण केंद्र नव्याने बांधणे या लेखाशिषर्काखाली सन २०२२-२३ या आर्थीक वर्षात रुपये १००.०० लक्ष ठेवण्यात आलेले आहेत. या लेखाशिर्षकातून रु.२३.१९ लक्ष खर्च झालेला असून उर्वरीत रु.७६.८१ लक्ष मात्र अखर्चीत असून या लेखाशिर्षकामधून नविन पाईप लाईन टाकणे रु.२५.०० लक्ष व पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे या लेखाशिर्षकात रु.१०.०० लक्ष तसेच पाणी टँकर भाडे रु.४०.०० लक्ष निधी पुर्नविनियोजन करणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**